# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.
E-mail:- desk11 dte@gmail. Internet: www.dtemaharashtra.gov.in
दूरध्वनी ०२२ - ३०२३३४७०/ ४११/ ४३१, फॅक्स २२६९२१०२/२२६९०००७


क्रमांक : ११/आस्था/प्रशिक्षण/२०१५-१६/९२४
दिनांक : ११/०५/२०१६

प्रति
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय : संवर्ग 'अ' व 'ब'मधील नवनियुक्त अधिकाऱ्यांकरीता उजळणी वर्ग (Refresher Course) नामनिर्देशन करण्याबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ,दि.२३/०९/२०११.
२. यशदा यांचे पत्र क्र.CHD/2016-17/STP-FTP-TED/002,Dt.04/05/2016.
३. सामन्य प्रशासन विभाग,शासन निर्णयक्र.प्रशिस-२०१५/प्र.क्र.६१/२०१५/आरक्षा-२/ एलआयबी.१७०१३/आय/२०१६-एलआयबी

उपरोक्त विषयाबाबत वरील संदर्भिय पत्रान्वये गट-'अ' व 'ब' मधील नवनियुक्त अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची कार्यक्रम पत्रिका संचालनालयास प्राप्त झाली असून आपल्या विभागांतर्गत संस्थेमधील सोबत जोडलेल्या यादीतील अधिकाऱ्यांची यशदा, पुणे येथे दि.०१/०६/२०१६ ते दि.१२/०७/२०१६ या कालावधीमध्ये प्रशिक्षणासाठी निवड करण्यांत आलेली आहे. त्यानुसार प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना सदर प्रशिक्षणास उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त करण्याबाबतच्या सूचना आपल्यामार्फत संबंधित संस्थाप्रमुखांना देण्यांत याव्यात. सदर अधिकाऱ्यांच्या यादीमध्ये कंत्राटी तत्वावर कार्यरत अधिकाऱ्याच्या नावाचा समावेश असल्यास सदर अधिकाऱ्यास प्रशिक्षणास कार्यमुक्त करण्यांत येऊ नये व त्याबाबत संचालनालयास कळविण्यांत यावे.

सदर प्रशिक्षणाचा आर्थिक भार शासनावर असल्यामुळे जे अधिकारी प्रशिक्षणास उपस्थित राहणार नाहीत त्यांच्याकडून प्रशिक्षणासाठी आलेल्या खर्चाची वसूली करण्यांत येईल. प्रशिक्षणाचा खर्च प्रतिदिन प्रत्येकी रुपये २,०००/- आहे. प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करणे अनिवार्य आहे, जे संस्थाप्रमुख प्रशिक्षणासाठी अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणार नाहीत त्यांना त्यासाठी व्यक्तिश: जबाबदार धरुन त्यांचेविरुध्द कार्यवाही शासनाकडे प्रस्तावित केली जाईल. तसेच सदर प्रशिक्षणासाठी जे अधिकारी उपस्थित राहणार नाहीत त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यांत येईल व याबाबतची नोंद संबंधितांच्या गोपनीय अहवाल घेण्यांत येईल याची जाणिव संबंधितांना करुन देण्यांत यावी.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक ०१.०६.२०१६ रोजी सकाळी ९.३० वाजता सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रशिक्षणासाठी निवड करण्यांत आलेल्या सोबत जोडलेल्या आपल्या विभागातील अधिकाऱ्यांना यशदा, पुणे येथे सकाळी ९.०० वाजेपर्यंत उपस्थित राहण्याबाबत सूचित करण्यांत यावे. तसेच या प्रशिक्षणास उपस्थित राहणाऱ्या प्रशिक्षणार्थींची यशदामधील डीएसी वसतीगृहामध्ये निवासाची व भोजनाची व्यवस्था आरक्षीत करण्यात आलेली आहे.

याबाबत असे निदर्शनास आले आहे कीं, काही संस्थामार्फत, त्यांच्या संस्थेत कार्यरत अधिकाऱ्यांस प्रशिक्षणास कार्यमुक्त करण्यांत येत नाही. तसेच त्याबाबत या संचालनालयास तातडीने काही कळविण्यांत येत नाही. प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त करण्यांत आलेले सर्व अधिकारी प्रशिक्षणास उपस्थित न राहील्यामुळे प्रशिक्षणाचा खर्च वाया जातो. तरी आपल्या विभागांतर्गत संस्थेतील सोबत जोडलेल्या यादीतील एखाद्या अधिकाऱ्यास काही अपरिहार्य कारणास्तव प्रशिक्षणास उपस्थित राहणे शक्य नसेल, तर त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थाप्रमुखांने दिनांक २१.०५.२०१६ अथवा तत्पुर्वी ई-मेलद्वारे(desk11.dte@gmail.com) तसेच (०२२-३०२३३४७०) या दूरध्वनी क्रमांकावर या संचालनालयास कळविण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यांत यावेत.

सोबत : प्रशिक्षणार्थी यादी.

( प्रमोद नाईक )
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. उपसचिव तथा प्रशिक्षण व्यवस्थापक महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी मानार्थ सादर.
२. संचालक, मानव विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर.
३. संबंधित संस्था. (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत)
४. संबंधित अधिकारी. (संबंधित संस्था प्रमुखांमार्फत)
५. कार्यासन क्रमांक-४ व ४-अ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

पृ.क्र.विकाअ/आस्था/प्रशिक्षण/२०१६/2095
दिनांक:- 2 3 MAY 2016

प्रति,

प्राचार्य,शा.अभि.महा.अमरावती/शा.औ.निर्माणशास्त्र महा.अमरावती
प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,अमरावती/खामगांव/यवतमाळ/वाशिम/मुर्तिजापूर.
प्राचार्य,शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन,यवतमाळ यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

प्रत - **प्रोग्रामर,**वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सहसंचालक
तंत्र शिक्षण,अमरावती

| LIST OF CANDIDATES DEPUTED FOR THE FOUNDAATION TRAINING AT YASHADA PUNE FROM 01/06/2016 TO 12/07/2016 | | | |
|---|---|---|---|
| Sr no | Name | Post | Inst. Name |
| 1 | Mr.Bhanudas Vithal Yadhav | Head In Med .Elect | Government Polytechnic, Nanded |
| 2 | Mr. Balashabe Maruti Kardele | Head In Instrumentation | Govt. Polytechnic, Nagpur |
| 3 | Mr.Chandrkant Digamber Kapse | Head In Instrumentation | Maharashtra State Broad Of Technical, Mumbai |
| 4 | Mr. Mahedra Davane | Asst. Director (Tech.). | Directorate of Technical Education, M.S., Mumbai. |
| 5 | Mr. Nilesh Gopalrao Deshmukh | Head In Plastic & Poly | Govt. Polytechnic, Amravati |
| 6 | Mr. Kishor Lala Meshram | Head In Metallurgic | Govt. Polytechnic,Nagpur |
| 7 | Smt. Namita Sachin Kadam | Head In Metallurgic | Govt. Polytechnic,Pune |
| 8 | Dr. Pravin Pundlikrao Karde | Head In Instrumentation | Govt. Residential Women's Polytechnic, Yavatmal |
| 9 | Smt. Anjali Manikrao Raut | Head In Instrumentation | Govt.. Polytechnic,Nagpur |
| 10 | Mr.Jitendra Ramdashji Nikhade | Head In Instrumentation | Govt.. Polytechnic ,Mumbai |
| 11 | Mrs.Mrunal Umesh Kokate | Head In Instrumentation | Govt. Polytechnich, Pune |
| 12 | Mr.Deepk Nagnath Rewadkar | Head In Instrumentation | Govt. Polytechnich, Awsari |
| 13 | Mr. Mangesh Devidas Wagmare | Head In Chemical Engg. | Govt.. Polytechnic, Yavatmal |
| 14 | Mr.Ninad Rambhau Jawade | Head In Chemical Engg. | Govt.. Polytechnic,Arvi |
| 15 | Smt. Aarti Shivaji Meshram | Head In HMCT | Maharashtra State Institute of Hotel Management and Catering Technology, Nagpur. |
| 16 | Prof.Dilp Rambhau Pangahvane | Prof. IN Automobile Engg | Govt. College Engg. & Research, Awsari |
| 17 | Prof. Kivlekar Arvind Vamanrao | Prof. In Computer Engg | Govt. College Engg.,Jalgaon |
| 18 | Prof. Ghumbre Shshikant U. | Prof. In Computer Engg | Govt. College Engg., Awsari |
| 19 | Prof.Nehe Navnath Sopan | Prof. In Instrumentation | Govt. College Engg.,Chandrpur |
| 20 | Prof. Kokate Rajendra D. | Prof. In Instrumentation | Govt. College Engg.,Jalgaon |
| 21 | Prof. Subhedar Rajashree P. | Prof. In Instrumentation | Govt. College Engg., Chandrpur |

\\192.168.1.9\minister_ppt\Desk11\Yashada Training\Yashda Training order 2016-17.doc

संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
म.रा. मुंबई.